| | | |
|---|---|---|
| MHGO030029642020 | दाखल दिनांकः | १६.१२.२०२० |
| | नोंदणी दिनांकः | १६.१२.२०२० |
| | निकाल दिनांकः | १४.०५.२०२५ |
| | कालावधीः | **व.** ०४ **म.** ०४ **दि.** २९ |

**निशाणी क्र. ६७**

**भाग 'अ'**

| | | |
|---|---|---|
| **गोंदिया येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. ३ यांचे न्यायालयात.** (पिठासीन अधिकारी महेंद्र के. सोरते) | | |
| **नियमीत फौजदारी खटला क्रमांक** | :– | **३०४/२०२०** |
| अपराध क्रमांक<br>पोलीस ठाणे | :–<br>:– | ३३९/२०२०<br>रामनगर, गोंदिया, ता. जि. गोंदिया. |
| **अभियोजन पक्ष** | **:–** | महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, रामनगर, गोंदिया,<br>ता. जि. गोंदिया. |
| **अभियोजन पक्षातर्फे** | :– | श्री. ए. जी. येळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | :– | विजय सुखविंदरसिंग राज,<br>वयः– ५१ वर्ष, व्यवसाय– मजूरी,<br>रा.– ए १०४, पार्क प्लाझा, यारी रोड, अंधेरी (प.),<br>मुंबई. |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी तर्फे** | :– | श्री. व्ही. एन. बारापात्रे व श्रीमती सविना टी. बेदी, विद्वान अधिवक्ता. |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | दि. २५.१०.२०२० रोजी रात्री २०.१५ ते दि. २९.१०.२०२० रोजी सकाळी ०८.४५ वाजताच्या दरम्यान. |
| प्रथम खबर दिल्याची तारीख | ०३.११.२०२० |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | १६.१२.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०३.१०.२०२० |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | २९.०४.२०२३ |
| खटला न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | ०९.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १४.०५.२०२५ |
| शिक्षेचा आदेश असल्यास | –– |

## आरोपीची सविस्तर माहिती

| **आरोपीचा दर्जा** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामीनावर सुटकेची तारीख** | **दोषारोपाचे कलम** | **आरोपीची निर्दोष सुटका झाली की आरोपीला शिक्षा झाली.** | **आरोपीची शिक्षा** | **फौजदारी प्रक्रिया संहितेल्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्या दरम्यान** |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | विजय सुखविंद रसिंग राज | ०३.११. २०२० | ०३.११. २०२० | भा. द. वि. चे कलम ३५४–अ व ३५४–ड अन्वये. | आरोपीची निर्दोष मुक्तता झाली. | –– | –– |

## भाग 'क'

## सरकारी साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

**अः– सरकारी साक्षीदारः–**

| दर्जा | साक्षीदाराचे नाव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा. क्र. १ | प्रफुल मिलींद भिमटे (नि. क्र. १६) | सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्ती व पाहणी पंचनाम्यावरील पंच |
| सा. क्र. २ | आकाश अरुण मेश्राम (नि. क्र. ३४) | सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्ती व पाहणी पंचनाम्यावरील पंच |
| सा. क्र. ३ | योगेशकुमार राजा जज्ञी (नि. क्र. ३५) | घटनास्थळ पंच |
| सा. क्र. ४ | डॉ. जुनेद कमरअली सय्यद (नि. क्र. ३७) | घटनास्थळ पंच |
| सा. क्र. ५ | राजेंद्र शिवाजी वामन (नि. क्र. ४९) | साक्षीदार |

**ब– बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः–**

| दर्जा | साक्षीदाराचे नाव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क– न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः–

| दर्जा | साक्षीदाराचे नाव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.

अ. सरकार पक्षातर्फेः–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १७ व १८ | जप्ती पंचनामा |
| २. | १९ व २० | सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहणी पंचनामा |
| ३. | २१ ते ३३ | हॅश जनरेशन सर्टिफिकेट |
| ४. | ३६ | घटनास्थळ पंचनामा |

ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड. जप्त वस्तुंचे वर्णनः–**

| अ. क्र. | वस्तुंचा क्रमांक | वस्तुंचे वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

:: **न्यायनिर्णय** ::

(दिनांक १४ मे, २०२५ रोजी घोषित)

...

आरोपीच्याविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३५४–अ व ३५४–ड नुसार दोषारोप सिध्द करण्याकरीता संपरिक्षा आहे.

२. **अभियोजन पक्षाचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे** :–

खबरी व पिडीतची ओळख लपविण्याकरीता सदर न्यायनिर्णयामध्ये तिच्या नावाऐवजी 'खबरी व पिडीत' असा उल्लेख करण्यात येत आहे. खबरी व पिडीत आणि आरोपी हे शेरनी चित्रपटाच्या चम्मूतील असून गेट वे हॉटेल, गोंदिया येथे घटनेच्या वेळी राहत होते. खबरी व पिडीत ही सहाय्यक व्यवस्थापक व आरोपी हा पूरक अभिनेता म्हणून सदर चित्रपटात काम करीत होते. दिनांक २५.१०.२०२० रोजी रात्री ०८.१५ वाजताच्या दरम्यान आरोपीचा खाजगी सहाय्यक राम हा खबरी व पिडीतला आरोपीने बोलविले आहे असे सांगितले. त्यावेळी, खबरी व पिडीतने त्यास नकार दिला. परंतू आरोपीच्या खाजगी सहाय्यकाने तातडीने बोलविले असल्याचे सांगितले. त्यावरुन ती आरोपीच्या खोलीच्या दारात गेली व तिला बोलावण्याचे कारण विचारले. त्यावेळी, आरोपीने तिला दुस–या दिवशीच्या कार्यक्रमाबाबत विचारणा केली असता तिने त्याच्या मोबाईलवर त्याबाबत संदेश पाठविणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दिनांक २८.१०.२०२० रोजी आरोपीने तिला दुस–या दिवशीच्या कार्यक्रमाबाबत विचारणा करण्याबाबत बोलविले. दिनांक २७.१०.२०२० रोजी सकाळी ०९.०० वाजताच्या दरम्यान आरोपीने हॉटेल गेट वे च्या लिफ्ट जवळ तिच्या खांद्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न केला. दिनांक २९.१०.२०२० रोजी सकाळी ०८.०० वाजताच्या दरम्यान जटाशंकर महाविद्यालय, बालाघाट येथे चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी ती आरोपीला व्हॅनीटीचा रस्ता दाखवित होती.

त्यावेळी आरोपीने तिच्या डाव्या खांद्यावर हात ठेवला. त्यानंतर चित्रपटाचे शेवटचे चित्रीकरण्याच्या वेळी आरोपीचा मेकअप मॅन सतीश व खाजगी सहाय्यक राम हे त्याच्यासोबत असतांना तिच्या तोंडावरील मास्क दोन–तीन वेळा बाजूला केला. सदर चित्रीकरण झाल्यानंतर आरोपीने तिला त्याच्या जवळ बोलविले. त्यावेळी, तिची वेनी खांद्याच्या पुढे झाली होती, त्यावेळी आरोपीने तिच्या केसांना स्पर्श करुन 'बाल तुम्हारे अच्छे है' असे म्हटले. त्यावेळी, तिला आरोपीचा राग आला. त्यानंतर आरोपीने तिला 'कभी तुम्हने अपने बाल छोटे करने की सोची है, छोटे बालो मे तुम बहूत अच्छी लगोगी' असे म्हटले. त्यामुळे तिच्या मनात लाज उत्पन्न झाली. त्यानंतर तिने सदर घटनेबाबत तिचे वरीष्ठ राजेश ठानीकन यास सांगण्याकरीता जात होती. त्यावेळी सितेश कानेकर तिला भेटला व तिने त्याबाबत त्यास सांगितले. त्यानंतर, हॉटेलला पोहचल्यानंतर तिने सदर घटनेबाबत राजेश ठानीकन व करुणा विश्वनाथ यांना सांगितले. त्यानंतर, तिने पोलीस ठाणे, रामनगर, गोंदिया येथे प्रथम खबर नोंदविली.

३. अनुषंगाने पोलीसांनी अपराध क्र. ३३९/२०२० भा. दं. वी. चे कलम ३५४ अ व ३५४ ड नुसार नोंदविला व अपराधाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पोपट दिवेकर यांच याकडे सोपविला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळण्याकरीता हॉटेल गेट वे, गोंदियाला पत्र दिले, घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज असलेला पेनड्राईव्ह दोन पंचासमक्ष जप्त केला, जप्तीतील सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहणीबाबत दोन पंचासमक्ष पंचनामे केले, दोन पंचासमक्ष सी.सी.टी.व्ही. फुटेजची हॅश व्हॅलू संगणक चालकाकडून काढून घेतली, जप्ती मुद्देमालाबाबत मुद्देमाल पावती तयार केली, खबरी व पिडीत आणि साक्षीदार यांचे फौ. प्र. सं. चे कलम १६४ नुसार बयान नोंदविले, इतर साक्षीदारांचे बयान नोंदविले, गेट वे हॉटेल, गोंदिया येथे येणा–या व जाणा–या ग्राहकांच्या तपशीलाच्या नोंदवहीची प्रत प्राप्त केली, शेरनी चित्रपटाच्या चित्रीकरणाचे वेळापत्रक मिळण्याकरीता कार्यकारी निर्माता यांना पत्र दिले व चित्रीकरणाच्या वेळापत्रकाची प्रत प्राप्त केली, आरोपी व खबरी यांच्या मोबाईलचे सी.डी.आर., एस.डी.आर. व टॉवर लोकेशन मिळण्याकरीता सायबर सेल, गोंदियाला पत्र दिले व सी.डी.आर., एस.डी.आर. व टॉवर

लोकेशन प्राप्त केले, आरोपीला गुन्ह्यात अटक केली व तपासाअंती पोलीस ठाणे अधिकारी यांनी आरोपीच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करून प्रस्तूत अभियोग आरंभला.

४. माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी आरोपीच्या विरुध्द नि. क्र. ९ नूसार दोषारोप निश्चित केले. ते त्याला मराठी भाषेत समजावुन सांगितले असता त्याने गुन्हा अमान्य असल्याचे सांगितले व संपरिक्षा घेण्याची मागणी केली असे दोषारोप व आरोपीचे प्रतिवेदन (नि. क्र. १०) च्या अवलोकनावरुन दिसून येते. अभियोजन पक्षाच्या पुराव्यानंतर आरोपीचे निवेदन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) अन्वये नि. क्र. ६३ नूसार नोंदविण्यात आले. आरोपीने खोट्या गुन्हयात गोवल्याचा बचाव घेतला आहे.

५. खटल्याचे निर्णयाकरीता खालील मुद्दे उत्पन्न होतात. त्यावरील निष्कर्ष मी खाली नमुद केलेल्या कारणमिमांसेसह देत आहेः–

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोजन पक्ष असे सिध्द करतो काय की, दि. २५.१०.२०२० रोजी रात्री ०८.१५ वाजता ते दि. २९.१०.२०२० रोजी सकाळी ०८.४५ वाजताच्या दरम्यान हॉटेल गेट वे, गोंदिया, ता. जि. गोंदिया येथे कार्यक्रमाची रुपरेषा मागणी करण्याच्या बहाण्याने आरोपीने खबरी व पिडीतशी नको असलेली शारीरीक जवळीक साधून तिचा लैंगिक छळ केला? | **नाही.** |
| २) | अभियोजन पक्ष असे सिध्द करतो काय की, वरील तारीख व ठिकाणी खबरी व पिडीतने आरोपीमध्ये स्वारस्य नसल्याचे स्पष्टपणे दाखवून देखील त्याने तिच्याशी संबंध वाढवून | |

जवळीक साधण्याकरीता पाठलाग केला? **नाही.**

३) आदेश काय? **अंतिम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.**

:: **कारणमिमांसा** ::

६. आरोपीच्या विरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोजन पक्षाने वरीलप्रमाणे भाग 'क' नूसार एकुण पाच साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने बचावात कोणताही पुरावा दिलेला नाही.

**मुद्दे क्र. १ व २ करीताः**–

७. मुद्दे क्र. १ व २ हे एकाच घटनेशी निगडीत असून विश्लेषनाची पुनरावृत्ती टाळण्याकरीता व संक्षिप्तकरीता ते एकत्र विचारात घेतले आहेत. आरोपीच्या विरुध्द कथीत अपराध सिध्द करण्याकरीता अभियोजन पक्षास कथीत अपराधाच्या घटनेच्या वेळी आरोपीने खबरी व पिडीतशी नको असलेली शारीरीक जवळीक साधून तिचा लैंगिक छळ केला व तिने त्याच्यामध्ये स्वारस्य नसल्याचे स्पष्ट संकेत देवून देखील तिच्याशी संबंध ठेवून नको असलेली जवळीक साधण्याकरीता पाठलाग केला असे सिध्द करणे आवश्यक आहे. अनुषंगाने अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करणे क्रमप्राप्त ठरते.

८. खबरी व पिडीत ही संपरिक्षेदरम्यान मृत्यू पावल्यामुळे अभियोजन पक्षाला तिची हजेरी निश्चित करुन साक्ष नोंदविता आली नाही. त्यामुळे, अभिलेखावर खबरी व

पिडीतचा पुरावा उपलब्ध नाही. अभियोजन पक्षाने घटनास्थळावरील राजेंद्र वामन यांना साक्षीदार क्र. ५ म्हणून तपासले आहे. साक्षीदार क्र. ५ राजेंद्र वामन यांनी शेरनी चित्रपटाचे चित्रीकरणाकरीता नायक, नायिका व इतर कर्मचारी गेट वे हॉटेल, गोंदिया येथे राहत होते, त्यांना रामनगर पोलीसांकडून सदर चित्रपटाच्या कर्मचा–यापैंकी एका महिला कर्मचा–याने आरोपीच्या विरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल केला असल्याचे समजले अशी साक्ष नोंदविली आहे. त्यांनी बचाव पक्षाच्या उलटतपासामध्ये कथीत अपराधाच्या घटनेबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही ही बाब मान्य केली आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन ते कथीत अपराधाच्या घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचे दिसून येत नाही. त्यांची साक्ष ही ऐकीव स्वरुपाची आहे. त्यांच्या साक्षीला अभिलेखावर खबरी व पिडीत किंवा इतर कोणत्याही साक्षीदाराची सुसंगत साक्ष उपलब्ध नाही. त्यामुळे, सदर साक्षीदाराची साक्ष आरोपीचे अपराधीत्व सिध्द करण्याकरीता अभियोजन पक्षास महत्वाची नाही.

९. साक्षीदार क्र. १ प्रफुल भिमटे व साक्षीदार क्र. २ आकाश मेश्राम हे अभियोजन पक्षाच्या कथनानुसार घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्ती, पाहणी पंचनामा व हॅश व्हॅलू प्रमाणपत्रावरील पंच साक्षीदार आहेत. परंतू त्यांनी साक्षीमध्ये अभियोजन पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यांनी त्यांच्या साक्षीत दिनांक ०३.११.२०२० रोजी पोलीसांनी जप्ती पंचनाम्याकरीता पंच म्हणून बोलविले नाही व त्यांचे समक्ष कोणतीही जप्ती केली नाही असे सांगितले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे देखील कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष सदर जप्तीच्या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केले किंवा कसे हे माहित नाही. सदर साक्षीदारांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्ती पंचनामे, सदर फुटेज पाहणी पंचनामे व हॅश व्हॅलू प्रमाणपत्रावरील स्वतःच्या स्वाक्ष–या तेवढ्या ओळखलेल्या आहेत. मात्र त्यातील मजकूराबाबत

अनभिज्ञता दर्शविली आहे. सदर साक्षीदारांनी अभियोजन पक्षाच्या कथनास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोजन पक्षाच्या वतीने विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा कायद्याचे कलम १५४ नुसार न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले असता पोलीसांनी दिनांक ०३.११.२०२० रोजी गेट वे हॉटेल, गोंदिया येथे जप्ती पंचनाम्याकरीता पंच म्हणून बोलविले व त्यांच्या समक्ष दिनांक २५.१०.२०२० ते ३०.१०.२०२० या कालावधीतील सदर हॉटेलमधील सी.सी.टी.व्ही. फुटेज असलेले पेनड्राईव्ह जप्त केले व सदर सी.सी.टी.व्ही. फुटेज त्यांच्यासमोर पाहिले याबाबी नाकारलेल्या आहेत. सदर साक्षीदारांनी अभियोजन पक्षास सुसंगत साक्ष नोंदविली नसल्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष ही अभियोजन पक्षाच्या कथनास पूरक नाही. त्यामुळे त्यांची साक्ष देखील आरोपीचे अपराधीत्व सिध्द करण्याकरीता अभियोजन पक्षास महत्वाचे नाही.

१०. साक्षीदार क्र. ३ योगेशकुमार जज्ञी व साक्षीदार क्र. ४ सय्यद जुनेद अली हे अभियोजन पक्षाच्या कथनानुसार घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. परंतू साक्षीदार क्र. ३ ने अभियोजन पक्षाच्या कथनास सुसंगत साक्ष नोंदविलेली नाही. साक्षीदार क्र. ३ ने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्यास घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता पंच म्हणून बोलविले नाही व त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा तयार केला नाही. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनाम्यावरील स्वतःची स्वाक्षरी तेवढी ओळखली. मात्र त्यातील मजकूराबाबत साक्ष नोंदविली नाही. सदर साक्षीदाराने अभियोजन पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोजन पक्षाच्या वतीने विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याचा उलटतपास घेतला असता अभियोजन पक्षास पूरक अशी

कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे, सदर साक्षीदाराची साक्ष आरोपीचे अपराधीत्व सिध्द करण्याकरीता अभियोजन पक्षास महत्वाची नाही.

११. साक्षीदार क्र. ४ सय्यद जुनेद अली हे दिनांक ०४.११.२०२० रोजी पोलीसांनी त्यांना घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता पंच म्हणून गेट वे हॉटेल, गोंदिया, जटाशंकर महाविद्यालय, बालाघाट, फुले सभागृह येथे बोलविले व खबरीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळावरील दिसत्या परीस्थितीनुसार घटनास्थळ पंचनामा तयार केला अशी साक्ष नोंदवितात. परंतू, त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील स्वतःची स्वाक्षरी ओळखण्यास असमर्थता दर्शविली आहे. सदर साक्षीदाराने बचाव पक्षाच्या उलटतपासामध्ये ज्या दस्ताऐवजावर त्यांनी सही केली, तो दस्ताऐवज अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा नाही, खबरीने त्यांचे समक्ष बयान दिले होते, याव्यतिरिक्त काही घडले नव्हते व ते सरकारी कर्मचारी असल्यामुळे सरकारला मदत व्हावी म्हणून साक्ष नोंदविली आहे याबाबी मान्य केल्या आहेत. सदर साक्षीदाराकडून अभियोजन पक्ष कथीत अपराधाच्या घटनेचे ठिकाण सिध्द करण्यात अपयशी ठरला. सदर साक्षीदाराची साक्ष ही औपचारीक स्वरुपाची आहे. त्यामुळे, सदर साक्षीदाराची साक्ष देखील आरोपीचे अपराधीत्व सिध्द करण्याकरीता अभियोजन पक्षास महत्वाची नाही.

१२. वरील विवेचनावरुन अभिलेखावर कथीत अपराधाच्या घटनेच्या वेळी आरोपीने खबरी व पिडीतशी नको असलेली शारीरीक जवळीक साधून लैंगिक छळ केला व तिने त्याच्यामध्ये स्वारस्य नसल्याचे स्पष्ट करुन देखील तिच्याशी नको असलेली जवळीक साधण्याकरीता पाठलाग केला याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा उपलब्ध नाही. अभियोजन पक्ष आरोपीचा कथीत अपराधाशी असलेला संबंध प्रस्थापित करण्यात अपयशी

ठरला. त्यामुळे अभियोजन पक्ष आरोपीने कथीत अपराध केल्याचे सिध्द केलेले नाही. सबब, मी मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र. ३ करीताः–**

१३. मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष व कारणमिमांसेवरुन अभियोजन पक्ष आरोपीच्या विरुध्द भां. दं. वि. चे कलम ३५४–अ व ३५४–ड नुसार अपराध सिध्द करीत नाही. त्यामुळे आरोपी हा कथीत अपराधातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्तीतील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे पेनड्राईव्ह आव्हान कालावधीनंतर त्यातील मजकुरासह नष्ट करणे उचित ठरेल. अंततः मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करतोः–

## आदेश

१. आरोपी विजय सुखविंदरसिंग राज, रा. ए १०४, पार्क प्लाझा, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३५४–अ व ३५४–ड खालील आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते व त्याने जमा केलेली सुरक्षा रक्कम ही आव्हान कालावधीनंतर त्यास परत करण्यात यावी.

३. फौजदारी प्रकीया संहितेचे कलम ४३७–अ विचारात घेता या न्यायनिर्णयास आव्हान देण्यात आल्यास अपिलीय न्यायालयासमोर आरोपीची हजेरी निश्चित करण्याकरीता त्याने या आदेशाच्या दिनांकापासुन पुढील सहा महिन्याकरीता रुपये ७,०००/– चे जामीन बंधपत्र करुन द्यावे.

४. जप्तीतील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे पेनड्राईव्ह आव्हान कालावधीनंतर त्यातील मजकुरासह नष्ट करण्यात यावे.

(न्यायनिर्णय हा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३ (१) अन्वये खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

Digitally signed by MAHENDRA KESHAO SORTE
Date: 2025.05.15 17:25:55 +0530

ठिकाणः– गोंदिया.
दिनांकः– १४.०५.२०२५.

(महेंद्र के. सोरते)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३, गोंदिया.

.